प्रेस नोट **दिनांक ०६/११/२०२६**

‘‘पश्चिम परिमंडळ-२ मधील पोलीस ठाणे अंतर्गत दाखल गुन्हयात हस्तगत केलेला मुद्देमाल दिपावली सणाच्या अनुषंगाने मुळ मालक यांना परत केल्याबाबत.’’

पश्चिम परिमंडळ-२ मधील पोलीस ठाणे अंतर्गत दाखल गुन्हयात हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल दिपावली सणाच्या अनुषंगाने मुळ मालक यांना परत करण्याकरीता आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी सायंकाळी १७.०० ते १८.०० वाजेपर्यंत ‘‘**भव्य समारंभाचे**’’ आयोजन इरावती हॉल, टागोर रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई येथे करण्यात आले.

प्रस्तुत समारंभाचेवेळी खालील प्रमाणे मुद्देमाल मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई डॉ. श्री. अभिनव देशमुख सरांचे हस्ते मुळ मालक यांना परत करण्यात आलेला आहे. सदर मुद्देमालामध्ये रोख रक्कम, मोबाईल फोन, सोन्याचे दागिने, वाहने, मौल्यवान वस्तु, घडयाळे यांचा समावेश आहे.

एकूण वितरीत मुद्देमाल संख्या	**एकूण मुद्देमाल किंमत**
६६	**रू. ९१,९७,१४७/-** **(एक्याण्णव लाख सत्याण्णव हजार एकशे सत्तेचाळीस)**

प्रस्तुत मुद्देमाल वितरण समारंभ मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई डॉ. श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-२, मुंबई डॉ. श्री. मोहित कुमार गर्ग, तसेच पश्चिम परिमंडळ-२ मधील सर्व विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक (प्रशासन) व गुन्हे प्रकटीकरण अधिकारी यांचे उपस्थितीत यशस्वीरित्या पार पाडण्यात आला.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु), मुंबई श्री. मनोजकुमार शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली.

.....